**शिवकालीन पाणी साठवण योजना - स्वतंत्र बँक खाते उघडण्याबाबत.**

BYMB 8/8

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक ग्रापापु १००३/प्र.क्र.९५/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ मे, २००३**

वाचा :-- (१) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक ग्रापापु १००१/प्र.क्र.३३०/पापु-०७, दिनांक १४ फेब्रुवारी २००२
(२) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक ग्रापापु १००१/प्र.क्र.३७७/पापु-०७, दिनांक ४ ऑक्टोबर २००१

प्रस्तावना :-

पिण्याच्या व घरगुती वापराच्या पाण्याची उलब्धता वाढविणे व पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे बळकळीकरण करणे, यासाठी पावसाच्या पाण्याचा उपयोग करुन **"शिवकालीन पाणी साठवण योजना"** राज्यामध्ये राबविण्यास संदर्भीय क्रमांक १ येथील दिनांक १४/२/२००२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

२. सदर उपाययोजना राबविण्यासाठी ज्या स्त्रोतांमधून निधी उपलब्ध करुन दिला जाणार आहे त्याची माहिती संदर्भीय क्रमांक १ येथील दिनांक १४/२/२००२ च्या शासन निर्णयातील परिच्छेद २ मधील (ग) मध्ये देण्यात आली आहे. या स्त्रोतामधून संबंधित जिल्हा परिषदांना मिळणारा निधी हा जिल्हा परिषदेच्या एकत्रित जिल्हा निधीमध्ये जमा होत असून, त्यामधून या उपाययोजनेसाठी खर्च करताना बऱ्याच अडचणी येत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे या उपाययोजनेसाठी प्राप्त होणाऱ्या निधीसाठी जिल्हा स्तरावर स्वतंत्र बँक खाते उघडण्यास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करुन शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक ग्रापापु १००१/प्र.क्र.३३०/पापु-०७, दिनांक १४/२/२००२ मधील परिच्छेद २ (ग) मध्ये नमूद केलेल्या स्त्रोतांमधून **"शिवकालीन पाणी साठवण योजनेसाठी"** जिल्हा परिषदांना प्राप्त होणाऱ्या निधीकरीता **जिल्हा स्तरावर स्वतंत्र बँक खाते (राष्ट्रीयकृत अथवा सहकारी बँकेत) उघडण्यास शासन परवानगी देत आहे.**

२. सदर बँक खाते मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांच्या संयुक्त सहीने चालविण्यात यावे, जे या योजनेसाठी गठीत केलेल्या जिल्हास्तरीय समितीचे अनुक्रमे अध्यक्ष व सदस्य सचिव आहेत.

३. जिल्हास्तरीय समितीने मंजूरी दिल्या नुसार गावांना सर्वेक्षण व प्रत्यक्ष कामे करण्यासाठी या निधीचा वापर करावा.

४. या स्वतंत्र बँक खात्याचे लेखे, जिल्हा परिषदेतील ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील अथवा जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालयातील लेखा शाखे मार्फत ठेवण्यात यावेत याबाबतचा निर्णय संबंधित जिल्हयातील परिस्थिती लक्षात घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा स्तरीय समितीने घ्यावा.

५. या खात्याचे लेखा परिक्षण महालेखाकार यांच्या मार्फत करण्यात येईल.

६. या योजनेसाठी या पूर्वी दिलेली , जिल्हा परिषदेच्या जिल्हा निधी मध्ये जमा असलेली अखर्चीत रक्कम त्वरीत या स्वतंत्र बँक खात्यात वळती करून घ्यावी.

७. या बँक खात्यामध्ये जमा केलेल्या रकमा व त्यामधून केलेला खर्च याबाबतची **त्रैमासिक माहिती** ( जून अखेर, सप्टेंबर अखेर, डिसेंबर अखेर व मार्च अखेर ) त्यापुढील महिन्याच्या १५ तारखेपर्यंत शासनास पाठविण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवावे

**( सुधीर ठाकरे )**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

सर्व विभागीय आयुक्त,
सदस्य सचिव (प्रशासन), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
महालेखापाल महाराष्ट्र -१, मुंबई (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल महाराष्ट्र -२, नागपूर (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता),
मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषदा (सर्व)
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई,
उपमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व)
जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
सर्व अधिक्षक अभियंता, तथा जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद,
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
सर्व वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,
ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने,
निवडनस्ती, पापु-०७, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग